**प्रादेशिक योजना —पुणे.**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (४) अन्वये फेरबदल मंजूर करण्याबाबत.
मौजे भिलारेवाडी, ता.हवेली येथील स.नं.१, २(भाग) व ४ (जुना मौ. कात्रज स.नं.९६पै ,९७,९८) या जमिनी डोंगरमाथा व डोंगरउतार विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
शासन निर्णय क्रमांक:टिपीएस १८१२/८४६/प्र.क्र.१५८/१२/पुर्नबांधणी ६५/नवि-१३
दिनांक:- २४/१२/२०१३

शासन निर्णय :- सोबतची शासकिय अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(सुनिल मरळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत :-**
१)मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव.
२)मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव.
३)प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
**प्रति :-**
१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
३) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
४) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.
त्यांनी प्रकरणी मंजूर फेरबदलाच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करावयाचे भाग नकाशे ५ प्रतीत शासनास सादर करावेत.
५)जिल्हाधिकारी, पुणे.
६)व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय,पुणे.
त्यांना विनंती करण्यांत येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग-१ पुणे विभाग, पुणे पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास, संचालक,नगररचना, महाराष्ट्र राज्य,

पुणे व सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग,पुणे, जिल्हाधिकारी, पुणे व सहायक संचालक,नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांना पाठवाव्यात.)

७)कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

यांना विनंती की सदरची अधिसूचना या विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत यावी.

८)निवडनस्ती (नवि-१३).

F:\Notifications\Section 20 3.Docx

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक:- २४/१२/२०१३
अधिसूचना

महाराष्ट्र नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.
क्रमांक:- टिपीएस १८१२/८४६/प्र.क्र.१५८/१२/पुर्नबांधणी ६५/नंवि-१३.

ज्याअर्थी, पुणे जिल्हयाची प्रादेशिक योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त प्रादेशिक योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१८९५/२२७/प्र.क्र.२६/१५/नवि-१३, दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १० फेब्रुवारी १९९८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेतील प्रस्तावानुसार मौजे भिलारेवाडी, ता. हवेली येथील स.नं.१, २(भाग)व ४ (जुना मौ. कात्रज स.नं.९६पै, ९७,९८) (यापुढे "उक्त जमिनी" असा उल्लेख करण्यात आला आहे )या जमिनी 'डोंगरमाथा व डोंगरउतार' विभागात समाविष्ट आहेत ;

आणि ज्याअर्थी, भिलारेवाडी येथे मनुष्यवस्ती असलेची वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त जमिनी 'डोंगरमाथा व डोंगरउतार' विभागातून वगळून "रहिवास" विभागात समाविष्ट करणे आवश्यक आहे व त्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम २०(२) मधील तरतूदीनुसार खालील अटीसापेक्ष रहिवास विभागात समाविष्ट करण्याकरीता उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे ;

अट :-
विषयांकित जागेपैकी १:५ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्र उताराचे क्षेत्रावर कोणतेही बांधकाम अनुज्ञेय होणार नाही. आणि सदर क्षेत्र हे विकासासाठी व चटई क्षेत्र निर्देशांकाची गणना करणेसाठी विचारात घेता येणार नाही. अशा क्षेत्रात फक्त वृक्ष लागवड करणेत यावी.
(यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त फेरबदल "असा करण्यात आला आहे.)

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई - ३२.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार उक्त जमिन "रहिवास" विभागात समाविष्ट करण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने क्र.टिपीएस- १८१२/८४६/प्र.क्र.१५८/१२/पुर्नबांधणी ६५/नवि-१३, दिनांक ३१/०१/२०१३ अन्वये आम जनतेच्या हरकती/सूचना मार्गविण्यासाची नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१ पुणे विभाग पुरवणीत दिनांक ७ ते १३ फेब्रुवारी २०१३ रोजी पृ.क्र. ३ ते ४ वर प्रसिध्द केली असून विहीत मुदतीत प्राप्त सूचना/हरकती दाखल करणा-यांना सुनावणी देण्याकरिता व शासनास अहवाल सादर करण्याकरिता सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांना प्राधिकृत करण्यात आले होते. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकृत अधिकारी" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी उक्त प्राधिकृत अधिकारी यांच्या प्राप्त अहवालावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त जमिन खालील अटीसापेक्ष "रहिवास" विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोटकलम (४) व त्या अनुषंगाने प्राप्त अधिकारात शासन उक्त जमिनींबाबत उक्त फेरबदल प्रस्तावास खालील अटीसापेक्ष पुढीलप्रमाणे मंजूरी देत आहे व त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजूरीच्या दि.२५ नोव्हेंबर, १९८७ च्या अधिसूचनेतील फेरबदलांच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे :-

" **नोंद**

"मौजे भिलारेवाडी, ता.हवेली येथील स.नं.१,२ (भाग) व ४ [जुना मौ.कात्रज, ता.हवेली स.नं.९६(पै),९७,९८] हया जमिनी "डोंगरमाथा व डोंगरउतार" हया विभागातून वगळून खालील अटीसापेक्ष "रहिवास" विभागात समाविष्ट करण्यात येत आहे:-

**अट:-** विषयांकित जागेपैकी १:५ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्र उताराचे क्षेत्रावर कोणतेही बांधकाम अनुज्ञेय होणार नाही. आणि सदर क्षेत्र हे विकासासाठी व चटई क्षेत्र निर्देशांकाची गणना करणेसाठी विचारात घेता येणार नाही. अशा क्षेत्रात फक्त वृक्ष लागवड करणेत यावी".

उक्त मंजूर फेरबदलाखालील जमिनी दर्शविणारा भाग नकाशा टिपीएस-१८१२/८४६/प्र.क्र.१५८/१२/पुर्नबांधणी क्र.६५/नवि-१३,नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील कार्यालयात ठेवण्यात यावा :-

१) सहाय्यक संचालक नगर रचना, पुणे शाखा, पुणे २८३, नारायणपेठ, पुणे – ४११०३०.

२) जिल्हाधिकारी, पुणे.

सदर सूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(सुनिल मरळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

F:\Notifications\Section 20 3.Docx

**Government of Maharashtra**
Urban Development Department,
Mantralaya, Mumbai-32.
Date- 24/12/2013

**NOTIFICATION**

MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT 1966.
No. TPS-1812/846/CR-158/12/Reconstruction No-65/UD–13.

Whereas, the Government in the Urban Development Department, vide its Notification No. TPS-1895/227/CR-26/95/UD-13 dated the 25th November, 1997, has sanctioned the Regional Plan for Pune District (hereinafter referred to as " the said Regional Plan") under Section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act."), which has come into force with effect from the 10th February, 1998;

And whereas, as per the proposals of the said Regional Plan, the lands bearing S.No.1,2(part) and 4 of Village Bhilarewadi,Tal. -Haveli [Old S.No.96(part),97,98 of Village Katraj Tal-Haveli ] (hereinafter referred to as "the said lands") are included in 'Hill Top and Hill Slope Zone';

And whereas, in view of the fact that there are human settlements in Bhilarewadi, the Government is of the opinion that it is necessary to change the zoning of the said lands from 'Hill Top and Hill Slope Zone' to 'Residential Zone' and modify the said Regional Plan accordingly as per the provisions of Section 20(2) of the said Act, subject to the following condition:-

**Condition :-**

"No development shall be permissible on any part of land having slope equal to or steeper than 1 :5 and no such land shall be taken into consideration for development and FSI calculation. Only tree plantation shall be done on such land."

( hereinafter referred to as 'the said modification' )

And whereas, pursuant to the above, a notice bearing No.TPS-1812/846/CR-158/12/Reconstruction-65/UD-13,dated 31/01/2013 regarding the proposed modification under sub section (3) of the Section 20 of the said Act,was published, which appeared in the Maharashtra Government Gazette, Part-I, Pune Division supplement dated 7-13 February,2013 on pages 03 to 04, for inviting suggestions/objections from the general public and the Assistant Director of Town Planning, Pune, was appointed as an officer by

the Government to hear suggestions/objections and submit his report to the Government (hereinafter referred to as "the said officer") ;

And whereas, after considering the report submitted by the said officer and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that the said land should be included in 'Residential Zone' on cetain condition:

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (4) of Section 20 of the said Act, the Government hereby finally sanctions the said modification and for that purpose modifies the Notification dated the 25th Nov.1997 sanctioning the said Regional Plan as follows :-

***" In the Schedule of Modifications appended to the Notification dated 25th November 1997 sanctioning the said Regional Plan, after the last entry, the following new entry shall be is added :-***

***ENTRY***

*The lands bearing S.No.1,2(part) and 4 of village Bhilarewadi, Taluka Haveli [Old S.No.96(part),97,98 of village Katraj Tal-Haveli ] are deleted from 'Hill Top and Hillslope' and included in the 'Residential Zone' subject to the following condition":-*

**Condition :-**

***"No development shall be permissible on any part of land having slope equal to or steeper than 1 :5 and no such land shall be taken into consideration for development and FSI calculation. Only tree plantation shall be done on such land."***

The part plan bearing No.TPS – 1812/846/CR-158/12/Reconstruction-65/UD-13, showing the land under said modification shall be made available for inspection of the general public during office hours on all working days at the following offices-

1) Assistant Director of Town Planning, Pune Branch, 283, Narayan Peth,Pune-411030.
2) The Collector, Pune.

This notification shall also be published on the Government web- site www.maharashtra.gov.in

**By order and in the name of Governor of Maharashtra.**

(Sunil Marale)
**Under Secretary to Government.**

F:\Notifications\Section 20 3.Docx